




# कृष्णा एक्सप्रेस

संपादक - गोरख काशिनाथ तावरे







✻ कराड (जि.सातारा) ✻ वर्ष - २ रे. ✻ अंक २८२ वा. ✻ मंगळवार दि.२६ मे २०२६ ✻ पृष्ठे ४ ✻ किंमत : १ रुपये ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

✻ Karad (Dis.Satara) ✻ Vol - 2 ✻ Ishue - 282 ✻ Tuesday 26 May 2026 ✻ Page - 4 ✻ Price - 1 Rs. ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610


## आंबेनळी घाट अपघाताने सातारा जिल्हा हादरला

### सातारा जिल्ह्यातील आठ युवकांचा मृत्यू





(अजित जगताप)

सातारा : रायगड जिल्ह्यातील पोलादपूर-महाबळेश्वर रस्त्यावरील आंबेनळी घाटात काल रविवार दिनांक २४ मे रोजी मध्यरात्री झालेला स्कॉर्पिओ गाडीचा एका वळणावर ताबा सुटल्याने अपघात झाला . या अपघातात सातारा जिल्ह्यातील आठ युवकांचा मृत्यू झाला असून, सातारा जिल्हा हादरला आहे. या घटनेवर सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई व अनेकांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे.

सातारा आणि रायगड दोन्ही जिल्ह्यांच्या पोलीस अधीक्षकांशी संपर्क साधून पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी तातडीने परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच बचावकार्याबाबत आणि पीडित कुटुंबियांना सर्वतोपरी मदत करण्याबाबत प्रशासनाला आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत.

मध्यरात्री घडलेल्या घटनेनंतर अपघाताची माहिती मिळताच रायगड व सातारा जिल्ह्यातील पोलीस प्रशासन, महाबळेश्वर ट्रेकर्स, प्रतापगड रेस्क्यू टीम, महाड आणि पोलादपूर येथील ट्रेकर्स संस्थांसह स्थानिक नागरिकांनी रात्रीच्या अंधारातच दरीत उतरून तात्काळ शोध व बचाव कार्य सुरू केले. मोठ्या प्रयत्नांनंतर अपघातग्रस्तांचे मृतदेह बाहेर काढण्यात यश आले. तरुणांच्या नातेवाईक व मित्र परिवारांच्या दुःखामुळे सर्वत्र शोककळा पसरली आहे.

अपघातग्रस्त स्कॉर्पिओ गाडीचा क्रमांकएम एच ११डी एन २३४० असा असून, यामध्ये एकूण आठ जण तरुण मुले हे कोकणातील हर्णे बंदरावर गेले होते. तेथून सातारच्या दिशेने प्रवास करत असताना हा अपघात घडला. प्राथमिक माहितीनुसार, अवघड वळणावर वाहन चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने गाडी खोल दरीत कोसळल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

या अपघातामध्ये आसगाव ता. सातारा येथील चार, बोरगाव ता. चिपळूण जि. रत्नागिरी येथील एक, मर्ढे ता.जि. सातारा येथील दोन, खटाव ता. खटाव जि. सातारा येथील एक अशा आठ युवकांचा अपघातात मृत्यु झाला आहे. सोमवारी २५ मे रोजी सकाळी पुन्हा एकदा मदत कार्याला गती आली. या अपघातात सातारा जिल्ह्यातील महेश अनिल पवार वय २५वर्ष,आदित्य अशोक साळुंखे वय- २१ वर्ष, रितेश राजेंद्र लोखंडे वय -२५ वर्षे ,सुहास जितेंद्र लोखंडे- २० वर्षे,अंश समीर चव्हाण वय- १८ वर्ष ,उत्कर्ष आनंद शिंगटे वय- २१ वर्षे, अनिल अभिमन्यू शिंगटे वय- २५वर्ष ,नितीन किसन नायकोंडे वय- ३५ वर्ष अशा आठ तरुणांचा मृत्यू झालेला आहे. सातारा तालुक्यातील आसगाव या ठिकाणाहून हे मित्र सहलीसाठी गेले होते अशी माहिती मिळाली आहे.

सदरची घटना समजताच सातारा जिल्ह्यात शोककळा पसरली आहे. यातील एका तरुणाचा काल वाढदिवस असल्याची माहिती मिळाली आहे. या घटनेची माहिती मिळताच या तरुणांच्या नातेवाईकांनी आंबेनळी घाटाच्या दिशेने धाव घेतली आहे. सध्या आसगाव, प्रभूचीवाडी, खटाव, मर्ढे गावामध्ये सन्नाटा पसरला आहे.

## बंगळूर-मुंबई एक्सप्रेसचे जल्लोषात स्वागत

### कराडला प्रवाशांना पेढे वाटप; चालकांचा सत्कार



कराड : नव्याने सुरू झालेल्या बंगळूर (१६५३३) एसएमव्हीटी ते मुंबई लोकमान्य टिळक टर्मिनस एक्सप्रेस रेल्वेचे आज दुपारी एकला कऱ्हाड रेल्वे स्थानकात उत्साहात आगमन झाले. यावेळी रेल्वे चालकांचा सत्कार करण्यात आला. तसेच प्रवाशांना पेढे वाटून जल्लोषात स्वागत करण्यात आले. प्रवाशांच्या सेवेत दाखल झालेल्या पहिल्या फेरीच्या बंगळूर-मुंबई एक्सप्रेस गाडीचे मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढवून पूजन करण्यात आले. गाडीचे लोकोपायलट प्रविण सिंह व सहाय्यक चालक पुदाले यांचे स्वागत करून त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमावेळी रेल्वे विभागीय सल्लागार समितीचे सदस्य गोपाल तिवारी, माजी सदस्य श्रीनिवास डुबल, उद्योजक राजेंद्र लाहोटी, बाबरमाचीचे माजी उपसरपंच सुरेश पाटील, स्थानक प्रबंधक चंद्रशेखर सोनटक्के, उपप्रबंधक वल्लभ पंडित, परिवहन निरीक्षक राजेश वानखेडे, आरपीएफचे उपनिरीक्षक देवेंद्र पटेल, संरक्षण निरीक्षक सागर जाधव, ऑपरेटर रवी बिराजदार, राहुल ठाकरे, ग्रामस्थ व प्रवासी उपस्थित होते.

ही रेल्वे मंगळवार व शनिवार रात्री ८.३५ वाजता बंगळूरहून सुटणार असून दुसऱ्या दिवशी दुपारी १२.०२ वाजता कऱ्हाड येथे पोहोचणार आहे. त्यानंतर सातारा, पुणे, लोणावळा, कल्याण, ठाणे मार्गे रात्री ८.४० वाजता मुंबई एलटीटी येथे आगमन होईल. सुमारे १२०८ किलोमीटर अंतर पार करणारी ही गाडी पश्चिम महाराष्ट्रातील प्रवाशांसाठी सोयीची ठरणार असून उद्योग, पर्यटन, शेती, वैद्यकीय व शिक्षण क्षेत्रासाठीही या मार्गामुळे मदत होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## अधिक मासात व्हीआयपी दर्शन बंद; घुसखोरांवर कठोर कारवाई

### भाविकांना सुलभ दर्शनासाठी मंदिर प्रशासनाचे नियोजन

पंढरपूर : अधिक मासानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी लाखो भाविक पंढरपुरात दाखल होत असल्याने मंदिर प्रशासनाने व्हीआयपी दर्शन पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. दर्शन रांगांमध्ये घुसखोरी करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दर्शन रांग व मंदिर परिसरात शेडनेट उभारण्यात आले असून रांगा वॉटरप्रूफ करण्यात आल्या आहेत. भाविकांना सुलभ, जलद व शांततेत दर्शन मिळावे यासाठी जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांच्या सूचनेनुसार प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे.

राज्यासह देशभरातून मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपुरात येत आहेत. या पार्श्वभूमीवर दर्शन रांगांचे नियोजन काटेकोरपणे करण्याचे आदेश प्रशासनाने दिले



आहेत. कोणत्याही भाविकास नियमबाह्य पद्धतीने दर्शन देऊ नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ (२) अंतर्गत दर्शन रांगांमध्ये घुसखोरी करणाऱ्यांवर प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. दर्शन रांगेत घुसखोरी करून गोंधळ निर्माण करणाऱ्यांवर तसेच भाविकांना त्रास देणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, अधिक मासात श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दर्शनाची वेळ सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत ठेवण्यात आली आहे. दर्शन रांगेचे प्रवेशद्वार रात्री १० वाजता बंद केले जाते. रात्री १२ ते पहाटे ४ या वेळेत श्रींची विश्रांती, तर पहाटे ४ ते ५ या वेळेत काकड आरती व नित्यपूजा होत असल्याने दर्शन बंद राहते. त्यामुळे भाविकांनी दर्शनाच्या वेळेची माहिती घेऊनच रांगेत प्रवेश करावा, असे आवाहन कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी केले आहे.

### मंगळवारपासून राज्यात तीव्र आंदोलन

मुंबई : सत्तेत आल्यावर ३५ रुपये लिटरने पेट्रोल डिझेल देऊ अशा वल्गना करणारे सत्तेत आल्यापासून पेट्रोल-डिझेल-एलपीजी सिलिंडरच्या किंमती गगमाला भिडल्या आहेत. मागील ११ दिवसातच पेट्रोल डिझेलच्या किमती ८ रुपये प्रति लिटरने वाढवलेल्या आहेत. इराण युद्धाच्या नावाखाली केलेली ही दरवाढ आधीच महागाईने पिचलेल्या जनतेच्या जखमेवर मीठ चोळणारी आहे. ही दरवाढ सर्वसामान्य जनतेच्या खिशावर दरोडा टाकणारी असून सरकारने तात्काळ मागे घ्यावी आणि महागाई नियंत्रणात ठेवता येत नसेल तर नरेंद्र मोदींनी खुर्ची सोडावी, अशी टीका करताना या दरवाढीविरोधात २६ मे पासून प्रत्येक जिल्ह्यात आंदोलन करण्यात येईल असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले.

## कृष्णा सहकारी साखर कारखाना निवडणूक

### नामनिर्देशन पत्रांची छाननी पूर्ण;६ अर्जांवर आक्षेप प्रलंबित

कराड : यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना मर्यादित, रेठरे बुद्रुक (ता. कराड) येथील २०२६-२०३१ संचालक मंडळ निवडणूक प्रक्रियेतील नामनिर्देशन पत्रांची छाननी आज, दिनांक २५ मे २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात शांततापूर्ण वातावरणात पूर्ण करण्यात आली. छाननी प्रक्रिया गटनिहाय पद्धतीने राबविण्यात आली. प्रारंभी राखीव प्रवर्गातील नामनिर्देशन पत्रांची तपासणी पूर्ण करून त्यानंतर इतर गटनिहाय अर्जांची सविस्तर छाननी करण्यात आली. एकूण १३९ नामनिर्देशन पत्रांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी १२ अर्ज दुबार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, ६ नामनिर्देशन पत्रांवर आक्षेप नोंदविण्यात आले असून, या प्रकरणांचा अंतिम निर्णय अद्याप प्रलंबित ठेवण्यात आला आहे. संबंधित आक्षेपांवर निवडणूक निर्णय अधिकारी पुढील सुनावणीनंतर निर्णय जाहीर करणार आहेत.

छाननी प्रक्रियेत उमा अजितकुमार देसाई, पाटील अविनाश किसन, जगताप संजय मोहन, पाटील सुरेश गणपती, पाटील सुरेश संभाजी व जाधव संतोष बबन यांसह विविध उमेदवारांचे अर्ज तपासण्यात आले. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २६ मे २०२६ रोजी वैध नामनिर्देशन पत्रांची अधिकृत यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर उमेदवारांना नामनिर्देशन मागे घेण्यासाठी २६ मे ते ९ जून २०२६ हा कालावधी देण्यात आला आहे.

संपूर्ण छाननी प्रक्रिया शिस्तबद्ध व पारदर्शक पद्धतीने पार पडल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. या निवडणुकीकडे सभासद व राजकीय वर्तुळाचे विशेष लक्ष लागले आहे.

## आंबेनळी घाट अपघात: मृतांच्या कुटुंबियांना तातडीने मदत करा

### पालकमंत्री शंभूराज देसाई यांचे सातारा व रायगड जिल्हा प्रशासनाला निर्देश

सातारा : रायगड जिल्ह्यातील पोलादपूर-महाबळेश्वर रस्त्यावरील आंबेनळी घाटात काल मध्यरात्री झालेला स्कॉर्पिओ गाडीचा अपघात अत्यंत दुर्दैवी आणि मन हेलावून टाकणारा आहे. या अपघातात आठ युवकांचा मृत्यू झाला असून, या घटनेवर सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे.

घटनेची माहिती मिळताच पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी तात्काळ सातारा आणि रायगड दोन्ही जिल्ह्यांच्या पोलीस अधीक्षकांशी संपर्क साधून परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच बचावकार्याबाबत आणि पीडित कुटुंबियांना सर्वतोपरी मदत करण्याबाबत प्रशासनाला आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत.

अपघाताची माहिती मिळताच रायगड व सातारा जिल्ह्यातील पोलीस प्रशासन, महाबळेश्वर ट्रेकर्स, प्रतापगड रेस्क्यू टीम, महाड आणि पोलादपूर येथील ट्रेकर्स संस्थांसह स्थानिक नागरिकांनी रात्रीच्या अंधारातच दरीत उतरून तात्काळ शोध व बचाव कार्य सुरू केले. मोठ्या प्रयत्नांनंतर अपघातग्रस्तांचे मृतदेह बाहेर काढण्यात यश आले असून प्रशासकीय सोपस्कार गतिमान करण्याचे निर्देश पालकमंत्री श्री. देसाई यांनी दिले आहेत.

अपघातग्रस्त स्कॉर्पिओ गाडीचा क्रमांक चक ११ उ्छ २३४० असा असून, यामध्ये एकूण आठ जण प्रवास करत होते. प्राथमिक माहितीनुसार, अवघड वळणावर वाहन चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने गाडी खोल दरीत कोसळल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. या अपघातामध्ये आसगाव ता. सातारा येथील चार, बोरगाव ता. चिपळूण जि. रत्नागिरी येथील एक, मर्ढे ता.जि. सातारा येथील दोन, खटाव ता. खटाव जि. सातारा येथील एक अशा आठ युवकांचा अपघातात मृत्यु झाला आहे. आम्ही या संपूर्ण घटनेवर आणि त्यानंतरच्या कार्यवाहीवर लक्ष ठेवून आहेत. दोन्ही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक माझ्या सतत संपर्कात आहेत. मृत व्यक्तींच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सर्वजण पाठीशी आहोत, अशा भावनाही पालकमंत्री श्री. देसाई यांनी व्यक्त केल्या.

## दादा लाड यांना पद्मश्री प्रदान

परभणी : परभणी जिल्ह्यातील कृषी क्षेत्रात उल्लेखनीय योगदानाबद्दल श्रीरंग देवबा लाड (दादा लाड) यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे आयोजित समारंभात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामुळे परभणीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. दादा लाड यांनी शेती क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत केंद्र शासनाने त्यांची पद्मश्री पुरस्कारासाठी निवड केली



होती.

त्यांचा हा सन्मान परभणी जिल्ह्यासह मराठवाड्यातील नागरिकांसाठी अभिमानाची बाब ठरला आहे. या पुरस्कारासाठी दादा लाड यांच्यावर विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## शासकीय सेवा सुलभ, गुणवत्तापूर्णसाठी जीपीआर प्रक्रिया राबवावी : देवेंद्र फडणवीस

मुंबई : राज्यातील शासकीय सेवा अधिक सुलभ, वेगवान आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी सर्व विभागांनी आपल्या सेवांचे पुनरावलोकन करून त्या गव्हर्नमेंट प्रोसेस रिइंजिनीअरिंग (जीपीआर) प्रक्रियेच्या कक्षेत आणाव्यात, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या गव्हर्नन्स प्रोसेस रिइंजिनिअरिंग आढावा बैठकीच्या अध्यक्षस्थानी ते बोलत होते. यावेळी अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव श्रीकर परदेशी, गेट्स फाउंडेशनचे प्रतिनिधी, समग्र संस्थेचे पदाधिकारी तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, सेवांची संख्या वाढविण्यापेक्षा त्यांच्या गुणवत्तेला प्राधान्य देणे आवश्यक आहे. आतापर्यंत १२२२ सेवांचे पुनरावलोकन



करून ७२३ सेवा नागरिकांसाठी सुलभ करण्यात आल्या आहेत. पुढील टप्प्यात सेवांचे एकत्रीकरण करून प्रक्रिया आणखी सुटसुटीत केली जाणार आहे. ‘आपले सरकार २.०’ अंतर्गत सेवा पुनर्रचनेचे काम १४ ऑगस्टपर्यंत पूर्ण करून १५ ऑगस्ट २०२६ पासून नागरिकांना नव्या स्वरूपातील सेवा उपलब्ध करून देण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. अनावश्यक टप्पे, कागदपत्रे आणि विलंब दूर करून प्रक्रिया अधिक पारदर्शक व जलद करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महसूल विभागाने केलेल्या सुधारणा कौतुकास्पद असून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सेवा प्रणालीवरही विशेष लक्ष देण्याचे निर्देश त्यांनी दिले. शासनाच्या कामकाजाची माहिती नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी डिजिटल माध्यमांचा वापर वाढवावा, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. ‘समग्र’ संस्थेने जीपीआर टप्प्याचे सादरीकरण केले असून, ‘पब्लिक ॲप’च्या वापराबाबतही माहिती देण्यात आली.

## संपादकीय....

# शाळांची दुकानदारी

शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची पायाभरणी आहे. मात्र अलीकडील काळात काही शैक्षणिक संस्थांकडून शालेय साहित्य विक्रीच्या नावाखाली सुरू झालेली दुकानदारी ही गंभीर चिंता निर्माण करणारी बाब ठरत आहे. प्रवेश प्रक्रियेपासून ते गणवेश, वह्या, पुस्तके, बूट, बॅग्स आणि अगदी स्टेशनरीपर्यंत सर्व वस्तू शाळांकडूनच खरेदी करण्याची सक्ती वाढताना दिसते. ही पद्धत शिक्षणाच्या मूळ उद्देशालाच बाधा आणणारी असून, पालकांच्या आर्थिक शोषणाचे नवे केंद्र बनत चालली आहे.शाळांनी शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याऐवजी व्यापारी मानसिकता स्वीकारणे ही दुर्दैवी बाब आहे. काही संस्थांमध्ये ठरावीक दुकानदारांशी संगनमत करून जादा दराने साहित्य विक्री केली जाते. या प्रक्रियेत पारदर्शकता नसते, तसेच पालकांना पर्याय दिला जात नाही. परिणामी, बाजारभावापेक्षा जास्त दराने साहित्य खरेदी करण्याची सक्ती पालकांवर येते. हे केवळ आर्थिक शोषण नसून, शिक्षण व्यवस्थेतील विश्वासाला तडा देणारे कृत्य आहे.शिक्षण विभागाने या संदर्भात वेळोवेळी मार्गदर्शक सूचना दिल्या असल्या तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी होताना दिसत नाही. शाळा व्यवस्थापन, काही वेळा अनधिकृत आर्थिक हितसंबंधातून, विद्यार्थ्यांच्या नावाखाली मोठा व्यवसाय उभा करत असल्याचे चित्र समोर येते. यामुळे ग्रामीण व मध्यमवर्गीय कुटुंबांवर अतिरिक्त आर्थिक भार पडतो. विशेषतः नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होताच या साहित्य बाजारपेठेला उधाण येते आणि पालकांना नाइलाजाने शाळेच्या अटी मान्य कराव्या लागतात.खरे तर शालेय साहित्य विक्री हा शाळांचा अधिकार नाही. शिक्षण संस्थांनी केवळ अध्यापनावर लक्ष केंद्रित करणे अपेक्षित आहे. बाजारपेठेतील स्पर्धात्मक दर, दर्जेदार साहित्याची उपलब्धता आणि पालकांचा स्वातंत्र्यपूर्ण निवडीचा अधिकार अबाधित राहिला पाहिजे. शाळांनी जर साहित्य विक्रीतून नफा कमावण्याचा मार्ग स्वीकारला, तर ते शिक्षणाच्या नैतिक चौकटीला धक्का देणारे ठरते.या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने कठोर भूमिका घेण्याची गरज आहे. शाळांमध्ये कोणत्याही प्रकारची सक्तीची खरेदी बंद करणे, ठरावीक दुकानांशी असलेले संगनमत उघड करणे आणि नियमभंग करणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. तसेच पालकांनीही जागरूक राहून अशा प्रकारांविरोधात आवाज उठवणे गरजेचे आहे.शिक्षण ही सेवा आहे, व्यवसाय नाही ही मूलभूत जाणीव पुन्हा अधोरेखित करण्याची वेळ आली आहे. शाळा जर दुकाने बनू लागल्या, तर भविष्यात विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षणाविषयीच अविश्वास निर्माण होण्याचा धोका आहे. त्यामुळे शालेय साहित्य विक्रीतील ही दुकानदारी तातडीने बंद होणे हे केवळ अपेक्षितच नाही, तर अत्यावश्यक आहे.

# जिल्हयात कृषी विभागा मार्फत कृषी तंत्रज्ञान शेतकाऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शेतकाऱ्यांच्या बांधावर

शेतक-यांना खरीप हंगामामध्ये तांत्रीक मार्गदर्शन होण्यासाठी, कृषी विभागाच्या विवीध योजना व उपक्रम या बाबत व्यापक प्रमाणात प्रचार प्रसिध्दी व्हावी व कृषि विषयक तंत्रज्ञान जास्तीत जास्त शेतक-यांपर्यंत पोहोचविता यावे यासाठी खरीप हंगामामध्ये क्षेत्रीय स्तरावर करावयाच्या विवीध कामांची रुपरेषा विवीध मोहीम स्वरुपातील कार्यक्रम व उपक्रमांची अंमलबजावनी करणे संदर्भात कृषि विभागातील अधिकारी, कर्मचारी यांचेमर्फत माहे एप्रिल २०२६ पासून जिल्ह्यामध्ये क्षेत्रीय स्तरावर व्यापक प्रमाणात व मोहीम स्वरुपात कार्यक्रम घेतले जात आहेत.

सन २०२६ हवामान अंदाजानुसार सन २०२६ मध्ये प्रशांत महासागरातील 'एल निनों स्थितीमुळे भारतीय मान्सूनवर विपरीत परिणाम होण्याची (कमी पाऊस व उष्णतेची लाट) शक्यता आहे. या नैसर्गिक संकटामुळे खरीप हंगामातील उत्पादनावर घट येण्याची शक्यता असून, शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी त्यांना वेळीच तांत्रिक मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. या संभाव्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी कृषी विभाग आणि कृषी विज्ञान केंद्रामार्फत गावपातळीवर 'शिवार फेरी' आयोजित करण्यात आलेल्या आहेत. या द्वारे खालील प्रमुख घटकांवर भर दिला जात आहे.

पीक निवड व नियोजनः कमी पाण्यावर येणाऱ्या व लवकर परिपक्व होणाऱ्या वाणांची निवड सुचवणे. सेंद्रिय निविष्ठा तयार करून त्याचा वापर करणे दशपर्णी अर्क, कंपोस्ट खत, गांडूळ खत, निमार्क, हिरवळीच्या खतांचा वापर ई मृदा ओलावा संवर्धनः आच्छादन (चींश्रलहळपस) आणि बी बी एफ वापर, योग्य आंतरमशागत याद्वारे जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्याचे तंत्र प्रात्यक्षिकांसह समजावून सांगणे, कीड व रोग नियंत्रणः वाढत्या तापमानामुळे पिकांवर येणाऱ्या संभाव्य कीड-रोगांच्या प्रादुर्भावाबाबत सतर्क करून एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापनाच्या उपाययोजना सुचवणे. पशुधन संरक्षणः चारा टंचाई यावर मार्गदर्शन करणे. पेरणीची वेळः पुरेसा पाऊस (७५ ते १०० मि.मी.) झाल्याशिवाय पेरणी न करणे. आंतरपीक पद्धतः जोखीम कमी करण्यासाठी आंतरपीक पद्धतीचा अवलंब करणे. पीक विमाः प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करणे.

खरीप हंगाम पूर्वतयारीसाठी ग्राम स्तरावर तसेच तालुका स्तरावर खरीप हंगामपूर्व सभांचे आयोजन करण्यात आले. या द्वारे खरीप हंगाममध्ये करावयाचे शेतीचे नियोजन व कृषि विभागामार्फत राबविण्यात येणा-या मोहीम स्वरूपातील कार्यक्रमांची सविस्तर रूपरेषा याबाबत प्राथमिक माहिती शेतक-यांना देण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत सातारा जिल्ह्यातील प्रत्येक गावामध्ये २५ कृषि विषयक मोहीम कार्यक्रम सुरु असून आतापर्यंत विविध विषयांचे एकूण ७६०७ मोहीम कार्यक्रमांच्या माध्यमातून १,२४,६४७ शेतक-यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. यामध्ये एल निनो बाबत जनजागृती, बीज प्रक्रिया मोहीम, घरचे सोयाबीन उगवण क्षमता चाचणी, हुमणी कीड व्यवस्थापन, बीबीएफ मूलस्थानी जलसंधारण, पट्टापेर पद्धत, माती परीक्षण मोहीम, जमीन सुपीकता निर्देशांक आधारित खताचा वापर जमीन आरोग्य पत्रिका वाटप, व्हाट्सअप ग्रुप, खरीप हंगाम तयारीची ग्रामपंचायत स्तरावर सभा व प्रमुख खरीप पिकांच्या तंत्रज्ञान प्रसारासाठी गाव निहाय प्रशिक्षण, कृषी निविष्ठा यांच्या वाजावी वापरा बाबत जनजागृती मोहीम, जैविक व सेंद्रिय निविष्ठा निर्मितीत वापर, कृषी विषयक माहिती तंत्रज्ञानाची साधने बाबत माहिती देणे, कृषी आधारित व्यवसाय यूनिट उभारणी, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन मोहीम, भात रीती यांत्रिकरण मोहीम भात पिकामध्ये युरिया उपलब्धता व वापर वाढवणे, पाणी फाउंडेशन डिजिटल शेतीशाळा, इ. मोहिमांच्या माध्यमातून कृषि विभाग शेतक-यांच्या प्रत्यक्ष बांधावर जाऊन शेतक-यांना मार्गदर्शन करीत आहे.

खरीप हंगामामध्ये या मोहीमस्वरूपातील कार्यक्रमांच्या माध्यमातून क्षेत्रीय स्तरावर एल निनों स्थितीमुळे भारतीय मान्सूनवर विपरीत परिणाम होण्याची (कमी पाऊस व उष्णतेची लाट) शक्यता असल्याने या नैसर्गिक संकटामुळे स्तर्शन केले जात आहे. शास्त्रीय पद्धतीने माती परीक्षणाचे नमुने गोळा करण्याची पद्धत याबाबत प्रात्यक्षिके घेण्यात येत आहेत.

माती परीक्षणाचे शेतीतील महत्त्व व माती परीक्षण अहवालाच्या आधारे संतुलित खतांचा वापर करणे याबाबत व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. बियाण्याची उगवण चांगली होण्यासाठी व पीक वाढीच्या प्राथमिक टप्प्यात कीड व रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये या साठी बीज प्रक्रिया प्रात्यक्षिकांचे तसेच ज्या पिकांचे घरगुती बियाणे शेतकरी वापरतात त्या पिकांचे बियाण्यांची उगवणक्षमतेबाबत खात्री करणे आवश्यक आहे या साठी सोयाबीन बरोबरच इतर पिकांच्याही बियाण्यांची उगवणक्षमता तपासण्याच्या पध्दतीबाबत प्रचार, प्रसार करण्यात येत आहे. खरीप हंगामात मुख्य पिकांच्या लागवड तंत्रज्ञानाबाबत प्रात्यक्षिक आधारित शेतीशाळा व प्रशिक्षण कार्यक्रमही राबविण्यात येत आहेत. कृषि यांत्रिकीकरण प्रचार व प्रसार, महाडीबीटी प्रणालीवर अर्ज वाढविणे व कृषी विभाग, कृषी सेवा केंद्र, कृषी विद्यापीठे यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी निविष्ठांच्या संतुलित वापराबाबत जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. पीक वाढीच्या सुरुवातीच्या काळातच काही ठिकाणी जास्त तीव्रतेच्या रसायनांचा वापर केला जातो याने पीक परिसंस्थेवर व मानवी आरोग्यावर अनिष्ट परिणाम होतात, हे टाळण्यासाठी पिक संरक्षक निविष्ठांचा संतुलित वापर करणेबाबत प्रचार व प्रसार करण्यात येत आहे. सेंद्रिय निविष्ठा तयार करणे व त्याच्या वापराबाबत प्रचार प्रसिद्धी करण्यात येत आहे. कृषी निविष्ठा वापरताना घ्यावयाची काळजी व वापरलेल्या निविष्ठांची वेष्टने, रिकामे डबे यांची योग्य विल्हेवाट लावणे, कीटकनाशके व रासायनिक औषधांच्या लेबल क्लेम विषयी जनजागृती केली जात आहे.

खरीप हंगामातील विविध पिकांच्या कीड व रोग व्यवस्थापणाबाबत शेतक-यांना माहिती दिली जात आहे सर्वसाधारणपणे उसाच्या क्षेत्रात हुमणी कीड आढळून येते. हुमणी कीड व्यवस्थापनाकरिता एकात्मिक पद्धतीचा अवलंब करणे अत्यावश्यक आहे. प्राधान्याने ऊस क्षेत्राच्या पट्ट्यात याची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे अशा भागामध्ये तसेच इतरही क्षेत्रगत हुमणी किडीचा प्रादुर्भाव आढळून येत असल्यास त्याठिकाणी सुद्धा हुमणी कीड नियंत्रणाबाबत प्रचार, प्रसार व प्रकाश सापळे प्रात्यक्षिक घेण्यात येत आहेत.

कृषी विभागामार्फत खरीप व रबी हंगामात पिक स्पर्धे चे आयोजन केले जाते. आपल्या जिल्ह्यातील जास्तीत जास शेतकऱ्यांनी यात सहभाग नौदवून पिक वाढीच्या तंत्रज्ञानाचा वापर करून विक्रमी पिक उत्पादन मिळवणे अभिप्रेत आहे. यात इतर शेतकरी प्रोत्साहित होतात व विजेत्या शेतकऱ्यांच्या पिक वाढीच्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रवृत होतात. या पिक स्पर्धेत सहभागी होण्याकरिता शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले जात आहे. बीबीएफ, मूलस्थानी जलसंधारण, पट्टापेर पद्धत जास्त पाऊस, उशिरा पाऊस, पावसाचा खंड यासाठी सदर उपचार अत्यंत प्रभावी आहेत याबाबतही व्यापक प्रमाणात प्रचार प्रसिद्धी केली जात आहे.

कृषी विषयक तांत्रिक माहिती, कृषि विभागाच्या विविध योजना जास्तीतजास्त शेतक-यापर्यंत समाज माध्यमाद्वारेही पोहोचण्यासाठी जिल्ह्याच्या कृषि विभागाचा व्हाटस अॅप चॅनल तयार करण्यात आलेला आहे, तसेच गावोगावी कयू आर (ट़ठ) उेवश) कोडही लावण्यात आलेले आहेत व त्यांच्या वापराबाबतही शेतक-यांना माहिती दिली जात आहे. कृषी विषयक विविध योजना, उपक्रम व कृषी तंत्रज्ञान जास्तीतजास्त शेतका-यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषि विभाग प्रयत्नशील आहे. तसेच सदरच्या मोहिमा यापुढील कालावधीत देखील सुरू राहणार असून शेतक-यांचे पिक उत्पादन वाढीसाठी प्रत्यक्ष शेतक-यांचे बांधावर कृषि विभाग कार्यरत राहणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतक-यांनी या मोहीम कार्यक्रमामध्ये सहभागी व्हावे.

**संकलन - जिल्हा माहिती कार्यालय, सातारा**

# केंद्र शहरातच स्थलांतरीत करावे

## नागोठणे पत्रकार संघाची आग्रही भूमिका

**(महेंद्र माने)**

नागोठणे : येथील रायगड जिल्हा परिषदेचे प्राथमिक आरोग्य केंद्र तात्पुरत्या स्वरुपात येथून सहा किलोमीटर अंतरावरील वांगणी-आमडोशी येथे हलविण्याचा घाट आरोग्य विभागाने घातला असून, याला नागोठणे पत्रकार संघाने तीव्र विरोध केला आहे. आरोग्य केंद्राची प्राथमिकता नागोठण्यासाठी महत्वाची असून हे केंद्र नागोठणे शहरातच स्थलांतरीत करावे अशी आग्रही भूमिका पत्रकार संघाने घेतल्याचे अध्यक्ष उदय भिसे यांनी सांगितले आहे.




याबाबत अधिक माहिती देताना भिसे यांनी सांगितले की, रायगड जिल्हा परिषदेची निवडणूक झाल्यानंतर नागोठणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला सुगीचे दिवस येणार हे निश्चित झालयं असून या केंद्राचे रूपडं कधी पालटणार याची नक्की अशी डेडलाईन समोर आली नाही, मात्र हे आरोग्य केंद्र नागोठण्यापासून दक्षिणेकडे सहा किलोमीटर अंतरावर वांगणी-आमडोशी येथील सुप्रीम पेट्रोकेमच्या वास्तुत स्थलांतरित करण्यात येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. तालुका आरोग्य अधिकाऱ्यांच्या एका पत्रानुसार सुप्रीमच्या इमारतीसाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाला त्यासाठी पैसे अर्थात भाडं मोजायचं आहे. मुळातच ही इमारत सुप्रीम पेट्रोकेमने नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी उपकेंद्र म्हणून बांधली असल्याची माहिती समोर येत आहे. तसेच रा.जि.प.ची या जिल्ह्यात जी काही महत्वाची आरोग्य केंद्र आहेत त्यात नागोठण्याचे केंद्र टॉप फाईवमध्ये असेल यात बिलकूल शंका नाही. एकतर हे केंद्र (किंवा रुग्णालय) वाहनांची अव्याहत वर्दळ असलेल्या मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्गावर आहे. नागोठण्याची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढतच असून, उद्योगांचा पसाराही वाढत आहे. आसपास आदिवासी वाड्यावस्त्याही मोठ्या प्रमाणावर आहेत. हे सर्व मुद्दे लक्षात घेऊन या प्राथमिक आरोग्य केंद्राला सुसज्जतेचा बुस्टर डोस द्या ही गेल्या अनेक वर्षांची मागणी आहे. स्थानिक पत्रकार म्हणून ही मागणी मी स्वतः प्रसारमाध्यमांतून अनेकदा लावून धरलेली आहे. परंतु थातूरमातूर मलमपट्टीपलीकडे काहीही घडलेलं नाही. कधी काळी नागोठण्यात खमक्या नेत्यांची वानवा नव्हती. आता असे नेतेच नागोठण्यात उरले नाहीत.

आज असे नेतृत्व असते तर प्राथमिक आरोग्य केंद्र तात्पुरते का होईना पण ते स्थलांतरित करताना जिल्हा परिषदेला दहादा विचार करावा लागला असता. सुप्रीम पेट्रोकेमने उपकेंद्र बांधून दिलंय हे ठीक आहे, वांगणी आणि परिसराला चांगली आरोग्य सेवा मिळावी याला कुणाचाही विरोध असण्याचे कारण नाही.

तेथील आरोग्य उपकेंद्र सक्षमतेने सुरू करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने पावले उचलावीत, त्याचे स्वागत आहे. पण नागोठण्याचे संपूर्ण केंद्रच तेथे हलविणे अप्रस्तुत आहे. नागोठणे शहरात ज्या काही शासकीय, निमशासकीय मोकळ्या इमारती आहेत त्या ठिकाणी हे केंद्र तात्पुरत्या स्वरुपात सुरू करता येईल का, हे पाहिले पाहिजे.

पावसाळ्यात गैरसोयीची ठरणार नाही, रुग्णवाहिकेची जा-ये सुकर ठरेल, वाहने उभी राहण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध होईल याची काळजी घ्यावी लागेल.

केंद्राच्या स्थलांतराचा घाट घातला जात असताना नागोठणे ग्रामपंचायतीला विश्वासात का घेण्यात आले नाही,तसेच आरोग्य केंद्र स्थलांतराच्या मुद्द्यावरून सर्वच राजकीय पक्षांना आवाज उठविण्याची नामी संधी उपलब्ध झाली होती. परंतु कडक उन्हामुळे (कदाचित) ती संधी हुकवण्यात आली. असो. या एकूणच निर्माण झालेल्या गदारोळात रायगड जिल्हा परिषदेचे स्थानिक सदस्य म्हणून सुमीत काते यांची नेमकी भूमिका काय आहे, हेही स्पष्ट झाले पाहिजे किंबहुना सर्वसामान्य माणूस ही भूमिका जाणून घेण्यास उत्सुक असल्याचे सांगून आरोग्य केंद्राची 'प्राथमिक'ता नागोठण्यासाठीच महत्त्वाची असल्याचे सांगून तीच आग्रही नागोठणे पत्रकार संघाचीही भूमिका असल्याचे उदय भिसे यांनी सांगितले. आहे.

# खाद्यतेलाच्या नावाखाली बेकायदेशीर डिझेलची वाहतूक करणारा टँकर जप्त

**(याकूब सय्यद)**

रायगड : मुंबई-नाशिक महामार्गावरील खारेगाव आणि कसारा परिसरामध्ये प्रशासनाकडून बेकायदेशीर इंधन वाहतुकीविरोधात जोरदार मोहीम उघडण्यात आली आहे. एका धाडसी कारवाईत कसारा पोलीस ठाणे हद्दीत 'एडिबल ऑईल' म्हणजेच खाद्यतेलाच्या नावाखाली बेकायदेशीररीत्या डिझेलची वाहतूक करणारा एक मोठा टँकर जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत पोलिसांनी तब्बल ४१ लाख २६ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला असून टँकर चालक आणि मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अपर पोलीस अधीक्षक (ठाणे ग्रामीण) यांच्या आदेशानुसार मुंबई-नाशिक महामार्गावरील चिंतामणवाडी पोलीस चौकीसमोर पोलिसांची नाकाबंदी सुरू होती. यादरम्यान नाशिकच्या दिशेने एका टँकरमधून अवैधरीत्या पेट्रोलियम इंधनाची वाहतूक होणार असल्याची गुप्त माहिती शहापूर विभागाच्या उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांमार्फत कसारा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक सुरेश गावीत यांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने पहाटे ३:४० वाजण्याच्या सुमारास मुंबई बाजूकडून येणारा संशयास्पद टँकर (क्रमांक MH-46-BU-2388) बॅरिकेडिंग करून थांबवला. टँकर चालक आसिफ करीम सय्यद (रा. पिंप्री, जि. सोलापूर) याच्याकडे चौकशी केली असता, टँकरमध्ये डिझेल असल्याचे त्याने कबूल केले. हे डिझेल त्याने टँकर मालक श्यामसुंदर अंगद दहिफळे (रा. कळंबोली, पनवेल) याच्याकडून गडचिरोली येथील सुरजागड खाणीत विक्रीसाठी नेण्यासाठी ताब्यात घेतले होते. या वाहतुकीबाबत कोणत्याही परवानग्या किंवा वैध कागदपत्रे नसल्याने ही वाहतूक पूर्णपणे अवैध असल्याचे निष्पन्न झाले.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या एकमेव मंदिराची उपेक्षा कधी थांबणार?




रत्नागिरी - हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंधुदुर्ग किल्ल्यावरील 'श्री शिवराजेश्वर मंदिरा'साठी तब्बल ५५ वर्षांनंतर शासनाने वार्षिक निधी ३ हजार रुपयांवरून १ लाख रुपये केला खरा; मात्र हा वाढीव निधी क्रूरकर्मा औरंगजेबाच्या कबरीच्या देखभालीच्या खर्चापेक्षा कमी आणि अत्यंत तुटपुंजा आहे.

औरंगजेबाच्या कबरीच्या देखभालीसाठी वर्षाला २ लाख ५५ हजार १६० रुपये (वर्ष २०२२-२३) आणि महाराष्ट्राच्या आराध्य दैवताला मात्र १ लाख, हे अत्यंत क्लेशदायक आणि दुर्दैवी आहे. हा छत्रपती शिवरायांचा अवमान आहे. उपमुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे यांनी महसूल विभागाच्या प्रधान सचिवांना दर महिन्याला ५० हजार रुपयांचा निधी देण्याचे निर्देश दिले होते; मग हा निधी कमी कसा काय झाला ? प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या लेखी छत्रपती शिवरायांचे मूल्य औरंगजेबापेक्षा कमी आहे का, असा संतप्त सवाल हिंदु जनजागृती समितीचे जिल्हा समन्वयक श्री. गोविंद भारद्वाज यांनी पत्रकार परिषदेत केला आहे.

रत्नागिरी येथे झालेल्या या पत्रकार परिषदेला श्री. संजय जोशी (राज्य समन्वयक, महाराष्ट्र मंदिर महासंघ), श्री. मयूर भितळे, (रत्नागिरी विभाग प्रमुख, गड किल्ले संवर्धन प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य), श्री. अरविंद बारस्कर (शिवचरित्र कथाकार), श्री. दीपेश वारंगे (जिल्हाध्यक्ष, गड किल्ले संवर्धन प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य), अधिवक्ता अमित काटे आणि श्री. सोहम खानविलकर (श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, रत्नागिरी)आदी मान्यवर उपस्थित होते.

गेल्या अनेक वर्षांपासून हिंदु जनजागृती समिती, हिंदु विधीज्ञ परिषद आणि शिवप्रेमी हा निधी वाढवण्यासाठी संघर्ष करत आहेत. महायुती सरकारने नुकताच २० मे २०२६ रोजी शासन निर्णय काढून श्री शिवराजेश्वर मंदिराचे वार्षिक अनुदान १ लाख रुपये केले. वरवर पाहता ही वाढ चांगली वाटत असली, तरी वास्तवात हा निधी आताही अत्यंत अपुरा आहे. माहितीच्या अधिकारातून प्राप्त झालेल्या माहितीनुसार भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाकडून औरंगजेबाच्या कबरीच्या देखभाल दुरुस्तीसाठी वर्ष २०२२ आणि २०२३ मध्ये तब्बल २,५५,१६० व २,००,६२६ रुपये निधी दिला गेला आहे. म्हणजेच, हा निधी छत्रपतींच्या मंदिराला घोषित निधीपेक्षा दुप्पट आहे.

वार्षिक १ लाख रुपये का अपुरे आहेत? : शासनाने मंजूर केलेल्या वार्षिक १ लाख रुपये निधीचा हिशोब केल्यास, महिन्याला जेमतेम ८,३३३ रुपये, अर्थात २७४ रुपये प्रतीदिनी वाट्याला येतात. एका दिवसाच्या खर्चाचा विचार केला, तरी महाराजांच्या मूर्तीवरील नित्यपूजेसाठी फुले, मोठा हार, रोजची दिवाबत्ती, धूप, नारळ, पूजाआरती, भाविकांना प्रसाद, मूर्तीला वस्त्रांलंकार, मंदिराची स्वच्छता, परिसर स्वच्छता, रोज मंदिरात बोटीने ये-जा करण्यासाठीचा प्रवास खर्च; मासिक खर्चामध्ये पुजाऱ्याचे वेतन, स्वच्छता कर्मचाऱ्यांचे वेतन; नैमित्तिक खर्चामध्ये मंदिराची रंगरंगोटी-डागडुजी आणि शिवजयंतीसारखे वार्षिक व अन्य उत्सव यांचा विचार करता वर्षाला १ लाख खर्च अत्यंत तुटपुंजा आहे.

प्रशासन व सरकारला सवाल आणि प्रमुख मागण्या: महिन्याला २५० रुपयांवरून ८,३३३ रुपये वाढवण्यासाठी सरकारला तब्बल ५५ वर्षे लागली. यापूर्वीची नावाला छत्रपती शिवराय म्हणत निधर्मीवादाची ढोलकी वाजवणारी अनेक सरकारे येऊन गेली; मात्र कोणी काहीच केले नाही.

आताचे हिंदुत्ववादी सरकार, छत्रपती शिवरायांच्या विचारांचे सरकार आहे, त्यामुळे या निधीमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला, हा स्तुत्य निर्णय आहे; मात्र हा वाढीव निधीही तुटपुंजा आहे, हे आम्हाला सरकारच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे. महाराजांच्या मंदिराकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई झाली पाहिजे. तसेच महाराष्ट्रावर चालून आलेला आक्रमक क्रूरकर्मा औरंगजेबाच्या कबरीसाठी दिला जाणारा निधी तात्काळ बंद करून तो निधीही शिवकार्यासाठी वळवावा, अशीही आम्ही मागणी करत आहोत.

छत्रपती राजाराम महाराजांनी बांधलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्राचीन व ऐतिहासिक मंदिरासाठी विशेष बाब म्हणून जोपर्यंत महिन्याला किमान १ लाख रुपयांचा (वार्षिक १२ लाख) निधी मंजूर केला जात नाही, तसेच मंदिर परिसराचे सुशोभिकरण केले जात नाही, तोपर्यंत आमचा हा लढा आणि पाठपुरावा असाच चालू राहील. सरकारने तातडीने यावर योग्य तो निर्णय घेऊन महाराष्ट्राच्या अस्मितेला न्याय द्यावा, असेही समितीने म्हटले आहे.

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी सक्सेस प्रिंटर्स, फा. प्लॉट नंबर १२६/३अ, प्लॉट नंबर ८, कृष्णा कॅनॉल, सैदापूर ता. कराड जि. सातारा पिन - ४१५१२४ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा - ४१५११० येथून प्रकाशित केले. ✲ संपादक - गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Success Printers F. plot No. 126/3A, Plot No.8, Krishna Canol Saidapur, Tal- Karad, Dist- Satara Pin-415124, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

# संस्कारयुक्त पिढी घडवण्यासाठी सुवर्णसंधी!

सनातन संस्था व मंदिर महासंघ यांच्या वतीने सनातन संस्कार प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला आहे. हा वर्ग वयोगट ९ ते १५ वर्षे मधील मुला-मुलींसाठी उपयुक्त असून, त्यातून त्यांच्यामध्ये नैतिक मूल्ये, सुसंस्कार, गुणसंवर्धन, आत्मबलवृद्धी आणि राष्ट्र-धर्म प्रेम यांची जडणघडण होणार आहे.हा प्रशिक्षण वर्ग २८ मे ते १ जून २०२६ या कालावधीत सायं. ४ ते ७ या वेळेत साई हाऊसिंग सोसायटी, सर्वे नं. ८९/क, दत्त मंदिर, गोडोली येथे होणार आहे. सध्याच्या काळात बालकांमध्ये योग्य संस्कार रुजवणे ही काळाची गरज असून, अशा उपक्रमांतून त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला निश्चित दिशा मिळते.या वर्गामध्ये मुलांना वयोगटानुसार सुलभ, रंजक आणि उपयुक्त पद्धतीने मार्गदर्शन केले जाणार आहे. विविध उपक्रम, संवाद, प्रात्यक्षिके आणि संस्कारमूल्यांवर आधारित शिकवणीतून मुलांच्या मनामध्ये चांगल्या सवयी, आत्मविश्वास आणि जबाबदारीची जाणीव निर्माण होईल. तसेच समाजासाठी उपयुक्त, चारित्र्यसंपन्न आणि कर्तृत्ववान पिढी घडविण्याचा उद्देश या वर्गामागे आहे. या वर्गासाठी मर्यादित प्रवेश असून, इच्छुकांनी लवकरात लवकर नावनोंदणी करावी.

रजिस्ट्रेशन लिंक: https://forms.gle/9bVVJM6ceiD6uy7n8, संपर्क: ७३५०७६७६७८ / ८७६७८४४३७५.

# कौटुंबिक वादातून ४ मुलांना विहिरीत फेकून पित्याने संपवले आयुष्य; ५ ठार

बुलडाणा : तालुक्यातील राजुरा शिवारात एका पित्याने आपल्या चार मुला-मुलींना विहिरीत फेकून स्वत:ही उडी घेत आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना २५ मे रोजी उघडकीस आली आहे. या घटनेत पित्यांसह दोन मुले आणि दोन मुली अशा पाच जणांचा मृत्यू झाला असून, परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, विजय मुसा किराडीया (२७, रा. राजुरा ग्रामपंचायत उमापूर) यांनी घरगुती वादातून टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक तपासात समोर येत आहे. त्यांनी आपल्या प्रीत (७), प्राची (५), पूर्वी (३) व पीयूष (दीड वर्ष) या चौघांना विहिरीत टाकून स्वत:ही विहिरीत उडी घेतली.

# शिवणी धरणातील मासे तडफडू लागले ;पाणीसाठा संपल्याने शेतकरी संकटात

शिराळा : तालुक्यातील शिवणी धरणातील उपयुक्त पाणीसाठा पूर्णतः संपल्याने परिसरात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. धरणातील पाणी गेटपर्यंतही पोहोचत नसल्याने कालव्यांना पाणी सोडणे अनेक दिवसांपासून बंद आहे. परिणामी शेतीसाठी पाण्याचा पुरवठा ठप्प झाला असून ऊस व भाजीपाला पिके वाळू लागली आहेत. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत.



धरणातील पाणी आटल्याने अनेक मासे तडफडू लागले असून त्यांच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला आहे. परिसरातील शेतजमिनी कोरड्या पडल्या असून सिंचनाअभावी मोठे नुकसान होत आहे. दरम्यान, वाकुर्डे बुद्रुक उपसा जलसिंचन योजनेचे पाणी शिवणी धरणात सोडण्याची मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# दक्षिण काशी वाईतील पहिल्या लघु कुंभमेळ्याची भव्य सांगता

## कृष्णातीरी शाही स्नानाने भक्तिमय वातावरण

(विजयकुमार हरिश्चंद्रे)

वाई : राज्यभरातील साधू-संतांची मांदियाळी, शिवभक्तांच्या शोभायात्रेने दुमदुमली वाई नगरी; धार्मिक पर्यटनाला चालना देण्याचा प्रयत्न महाराष्ट्राची दक्षिण काशी म्हणून ओळख असलेल्या वाई नगरीत प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या लघु कुंभमेळ्याची भव्य आणि भक्तिमय वातावरणात सांगता झाली. गेल्या पाच दिवसांपासून कृष्णा नदीच्या पवित्र तीरावर रंगलेल्या या धार्मिक सोहळ्याने संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेतले. विविध राज्यांतून आलेल्या साधू-संतांच्या उपस्थितीमुळे वाई नगरी अध्यात्म, श्रद्धा आणि संस्कृतीच्या रंगांनी न्हाऊन निघाली. कृष्णा नदीकाठी वसलेल्या वाई शहराला आधीपासूनच धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे.

महाबळेश्वरच्या सह्याद्री पर्वतरांगांतून उगम पावणारी कृष्णा नदी आणि तिच्या तीरावर वसलेले प्रसिद्ध ढोल्या गणपती मंदिर हे मंदिर पर्यटक व भाविकांचे प्रमुख आकर्षण मानले जाते. याच पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या लघु कुंभमेळ्यामुळे वाई शहरात धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. उत्तर प्रदेश, बिहार, आंध्र प्रदेश, तामिळनाडू आदी राज्यांमधून आलेल्या



साधू-महंतांनी या सोहळ्यात सहभाग घेतला. डोक्यावर शिवलिंग धारण केलेली महासाध्वी, उंदरासोबत फिरणारा साधू अशा विविध अनोख्या साधूंच्या उपस्थितीमुळे भाविकांमध्ये विशेष आकर्षण निर्माण झाले होते. कृष्णातीरी शाही स्नानासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली होती.

समारोपाच्या दिवशी शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. घोड्यांवर स्वार साधू, रथातून विराजमान महंत, भगव्या पताका, ढोल-ताशांचा गजर आणि हर हर महादेवच्या घोषणांनी संपूर्ण वाई नगरी दुमदुमून गेली. राज्याचे शिक्षण मंत्री यांच्या हस्ते या सोहळ्याचा समारोप करण्यात आला. वाई नगरपालिकेचे नगराध्यक्ष अनिल सावंत यांच्या पुढाकारातून या लघु कुंभमेळ्याचे आयोजन करण्यात आले होते. धार्मिक पर्यटनाला चालना मिळावी, वाईच्या सांस्कृतिक वारशाला जागतिक ओळख मिळावी आणि स्थानिक आर्थिक विकास व्हावा हा या आयोजनामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, या आयोजनावरून राजकीय वर्तुळात चर्चा रंगली. काही विरोधकांनी महागाईच्या काळात कोट्यवधी रुपयांचा खर्च अयोग्य असल्याची टीका केली. आयोजकांनी हा सोहळा वाईच्या सांस्कृतिक आणि पर्यटन विकासासाठी आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. महाआरती, धार्मिक प्रवचने, साधू-संतांचे दर्शन, तंबूमधील विविध धार्मिक कार्यक्रम, पुष्पवृष्टी आणि शाही स्नान अशा अनेक आकर्षणांनी हा लघु कुंभमेळा गाजला. संपूर्ण कृष्णा घाट भगव्या रंगात रंगून गेला होता. भाविकांनी ढोल्या गणपतीचे दर्शन घेत साधू-संतांकडून आशीर्वादही घेतले.

# कै.दादांच्या स्मृतीतून दातृत्वाची प्रेरणा

(रघुनाथ थोरात)

उंब्रज : दातृत्व म्हणजे दानशूरपणा, औदार्य अथवा निरपेक्षपणे दान करण्याची वृत्ती. हा एक श्रेष्ठ मानवी गुण आहे, ज्यामध्ये व्यक्ती स्वतः च्या हिताचा विचार न करता समाजाच्या कल्याणासाठी काही गोष्टींचा त्याग करते. दातृत्वात बदलल्यात काहीही मिळवण्याची अपेक्षा नसते. संत कबीर आणि महर्षी दधीची यांसारखी उदाहरणे भारतीय संस्कृतीत दातृत्वाची महती सांगतात.



आपल्या स्वर्गवासी वडिलांच्या प्रेरणेतून त्यांच्या स्मरणार्थ आपली जागा केंद्र सरकारच्या हर घर जल या महत्त्वाकांक्षी योजनेतून साकारलेल्या जलजीवन योजनेसाठी ग्रामपंचायतीला कोणताही मोबदला न घेता दान करणारे कराड तालुक्यातील उंब्रज पासून हाकेच्या अंतरावर असलेल्या कळंत्रेवाडी गावचे रहिवासी माजी सरपंच सुनील शंकरराव थोरात यांनी दाखवलेले दातृत्वाचे उदाहरण त्यापैकीच एक होय.

कळंत्रेवाडीच्या राजकीय तसेच सामाजिक जडणघडणीतील कै शंकरराव आबासाहेब थोरात उर्फ दादा यांचे योगदान निश्चितच नाकारता येण्याजोगे नाही. लोक त्यांना आदराने महा दादा म्हणत. माजी उपसरपंच सुनील थोरात हे त्यांचे वडील कै दादा यांचा गावाप्रती असलेला राजकीय तसेच सामाजिक विकासात्मक बदलांच्या ध्येयपूर्तीने पछाडलेला वसा आजही मोठ्या धिरोदत्त वृत्तीने यशस्वीपणे पुढे चालवत आहेत.

गावातील प्रत्येक सार्वजनिक कामात दादांची हातोटी,हातात घेतलेले काम पूर्ण केल्याशिवाय स्वस्थ न बसण्याची वृत्ती, रोखठोक,सडेतोड स्वभाव,चुकीच्या गोष्टींवर बोलण्याचे धाडस,कष्टाळू बाणा या जमेच्या बाजू दादांचे वेगळेपण नेहमीच सिद्ध करत असत.पांढरा रंग हा त्यागाचे प्रतीक मानला जातो. ग्रामीण भागातील राजकीय क्षेत्रात कार्यरत असलेले गावपुढारी हे पांढऱ्याशुभ्र खादीच्या कपड्यांचा वापर करतात. गावच्या विकासाच्या गाव गाड्यामध्ये कार्यरत राहून चुकीच्या गोष्टींचा विरोध करतात, गावच्या विकासात्मक धोरणांवर बोलतात, हे असं झालं पाहिजे,ते तसे झालं पाहिजे.परंतु,बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात ह्या म्हणीप्रमाणे या सर्व गोष्टी क्रियेवीण वाचाळता व्यर्थ ठरतात.गावातील सार्वजनिक उपक्रमांमध्ये भरीव,शाश्वत योगदान न देता हा सर्व खटाटोप निष्फळ ठरतो. फक्त पांढरी कपडे घालून गावच्या राजकीय क्षेत्रामध्ये कार्यरत असून चालत नाही.

कारण पांढरा रंग हा त्यागाचे प्रतीक आहे. त्यामुळे गावासाठी काहीतरी ठोस योगदान देऊन कोणत्याही फळाची न अपेक्षा करता त्यागाची भूमिका ठेवणे नितांत गरजेचे आहे. कारण त्याशिवाय तुमच्या पुढारपणाला अर्थ प्राप्त होत नाही. त्यामुळे आपले वडील कै शंकरराव आबासाहेब थोरात उर्फ महादादा यांच्या स्मृतीतून दातृत्वाची प्रेरणा घेतल्याची प्रतिक्रिया एवढी माजी उपसरपंच सुनील थोरात यांनी व्यक्त केली. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या सामाजिक भावनेतून, तळमळीतून स्वतःची जागा ग्रामपंचायतीला दान करून त्यागाचा निखळ आनंद घेणाऱ्या कळंत्रेवाडीस्थित माजी सरपंच सुनील थोरात आणि कुटुंबीयांनी दाखवलेले दातृत्व आजकालच्या राजकारण्यांना आदर्शवत असेच आहे..!

# बहुजन समाजाच्या आवाज लेखणीतून उतरल्याशिवाय न्याय मिळत नाही : पीएसआय सुभाष पवार

सातारा : सामाजिक,धार्मिक आदी क्षेत्रातील अन्यायाविरुध्द वाचा फोडणणारे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणजे अनिल वीर आहेत. आपल्या लेखणीतून ते बहुजन समाजाचा आवाज बुलंद करण्यासाठी अहोरात्र (अव्याहतपणे) प्रस्थापितांशी संघर्ष करीत असतात.असे गौरवोद्गार पीएसआय सुभाष पवार यांनी काढले. बंधुत्व प्रतिष्ठानचे संस्थापक अनिल वीर यांचा अभिष्टचिंतनपर सत्कार ठिकठिकाणी झाले आहेत.तेव्हा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या अनेकांनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. कडक उन्हाळ्यात मायेचा ओलावा मिळाला आहे.

सुभाष पवार पुढे म्हणतात, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहु महाराज, महात्मा जोतिराव फुले, छत्रपती शिवाजी महाराज अशा महामानवांची विचारधारा वीरसर जोपासत आहेत. शिवाय,सर्व सामान्य नागरिकांपर्यत पोहचविण्याचे आणि जागृती करण्याचे काम



आपल्या धारदार लेखणीतून करीत असतात.समाजात घडणाऱ्या लहान मोठ्या, संवेदनशील घटनांचे अचूक माहिती संकलित करून ती प्रसारित करतात.त्यामुळे तळागाळातील सर्व सामान्यांच्या व्यथा-वेदनांचे अचूक वार्तांकन करतात. अर्थातच आपणा सर्वांचे लक्षवेध करणारे पत्रकार म्हणजेच वीरसाहेब.भविष्यात आपली लेखणी अधिक धारदार व्हावी. अशीच कायमस्वरूपी तळपत रहावी.आपणांस उदंड अन् निरोगी आयुर्मान लाभो. हीच तथागत चरणी प्रार्थना अन् वंदन. अशाच प्रकारचे संदेश अनेकांनी पाठवले आहेत.

येथील मदन (बापू) खंकाळ (जिल्हाध्यक्ष,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया-आंबेडकर गट) यांनी तर सातारा व पुणे येथुन शुभेच्छा दिल्या.एवढेच नाही तर त्यांचे सर्व वरिष्ठांनी पुणे येथून वेळ काढून आपापल्या फोनवरून शुभेच्छा दिल्या. त्यामध्ये राज्यापातळीवरील बाळासाहेब पवार,कैलास जोगदंड, दादासाहेब ओव्हाळ आदींचा समावेश होता. याशिवाय, आरपीआय गवई गटाचे जिल्हाध्यक्ष संजय गाडे व त्यांचे सहकारी, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष रामदास कांबळे,जिल्हा उपाध्यक्ष संदीप कांबळे,बाळासाहेब जगताप, रेखाताई संजय जाधव (दाम्पत्य),शंकर शिंदे,गणेश कारंडे,युवा जिल्हाध्यक्ष अमोल गंगावणे व महासचिव सायली भोसले, रिपब्लिकन सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन रोकडे, पाटण तालुकाध्यक्ष सचिन कांबळे,आरपीआय आठवले गटाचे जिल्हाध्यक्ष किशोर गाल्फाडे (मातंग आघाडी), आनंद कांबळे, सूर्यकांत झिम्बरे, तालुकाध्यक्ष प्राणलाल माने व त्यांचे सहकारी, अरुण व सुरेश निकाळजे (कोर्टि-मुंबई), विकास चव्हाण,सुनील निकाळजे,बंधुत्व कृतिशील शिक्षक पुरस्कार विजेते मुख्याध्यापक चंद्रकांत चव्हाण, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर कांबळे, प्रा.लक्ष्मण कदम,शोभा भंडारे, माजी मुख्याध्यापक बाळकृष्ण चाळके,जिजाबा माने, केंद्रीय शिक्षिका नेहाताई विजयकुमार गायकवाड व बाळासाहेब जाधव,मंगेश डावरे, उज्वला कांबळे, रमेश ढेबे, ओबीसीचे नेते अनिल लोहार (महाबळेश्वर),किरण खंडाईत, तारळे विभागातून भानुदास सावंत, राहुल रोकडे, सुनील माने, ऋषी पवार,रवी माने, सोन्या माने आदी मान्यवर व कार्यकर्ते,किरण खंडाईत, संजय नितनवरे (अहिल्यानगर),भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय शिक्षक भागवत भोसले,नंदकुमार काळे, आबासाहेब दणाने, नंदकुमार भोळे (कराड-पाटण), दादासाहेब कांबळे,समता सैनिक दलाचे कमांडर-अनिल मोहिते, पिराजी जाधव, आफसाना बागवान, माधवी वरपे,संपादक मोहन वाघमारे, राजाराम भंडारे, कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष मारुती भोसले व त्यांचे सर्व सहकारी,भाऊराव अडसूळे, सचिन बल्लाळ,आनंदा वाघमारे आदींनीही शुभेच्छा दिल्या आहेत.

# 'उफान' व 'आपडी थापडी' कविता संग्रहांचा प्रकाशन सोहळा उत्साहात



पनवेल: सर्जनशील पब्लिकेशन, भारत परिवर्तन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कवी अंकुश माला डिगांबर चौरपगार लिखित 'उफान' कवयित्री अश्विनी अतकरे लिखित 'आपडी थापडी' कवितासंग्रहांचा प्रकाशन सोहळा आणि राज्यस्तरीय निमंत्रितांचे कवी संमेलन पनवेल येथे संपन्न झाले.

अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. प्रतिभा सराफ होत्या. ज्येष्ठ कामगार नेते अविनाशजी दोंड यांच्या हस्ते कवितासंग्रहांचे प्रकाशन करण्यात आले. दिग्दर्शन चरण जाधव, शब्दवेल साहित्य संघाचे अध्यक्ष प्रवीण बोपुलकर यांची उपस्थिती लाभली. सूत्रसंचालन सुप्रसिद्ध व्याख्याते मोनिका काळे, अमोल चरडे यांनी केले. कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध साहित्यिक दिपाली घाडगे होत्या.

प्रकाशित झालेल्या 'उफान' या कवितासंग्रहातील सामाजिक जाणीव आणि विद्रोही आशय तर 'आपडी थापडी' या बालसाहित्यप्रधान कवितासंग्रहातील निरागस भावविश्व यांचे मान्यवरांनी विशेष कौतुक केले. कवी रामदास गायधने, माधवी मोतलिंग व कवी विलास पुंडले यांनी केले होते. आयोजकांतर्फे सर्जनशील पब्लिकेशनचे प्रकाशक मा. देवेंद्र इंगळेकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. आभार प्रदर्शन प्रवीण बोपुलकर यांनी केले

# भाजप सरकार विरोधात शुक्रवार २९ मे रोजी राष्ट्रवादी पक्षाचे तीव्र आंदोलन

सातारा : सातारा जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पूर्वीसारखा मजबूत पाहायला मिळणार आहे. अनेक समस्यांमुळे सध्या सर्व नागरिक कंटाळून गेलेले आहेत त्यामुळे भाजप सरकार विरोधात शुक्रवार दिनांक २९ मे रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तीव्र आंदोलन सातारा जिल्ह्यात होईल अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी राष्ट्रवादी भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. सरकारच्या विरोधात आंदोलन करण्यासाठी सर्व समावेशक सूचनांचा आदर करण्यात येईल यासाठी प्रत्येक तालुक्यामध्ये बुधवार दिनांक २७ मे रोजी सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते विचार विनिमय करणार आहेत.

महागाई , वाढती बेरोजगारी, नीट पेपर फुटी मळे विद्यार्थ्यांना अभ्यास करूनही आत्महत्या करावी लागत आहे. औषधाची दुकाने बंद करण्याचे आंदोलन करावे लागत आहे. शेतकऱ्यांच्या शेती पिकाला योग्य दर मिळत नसल्यामुळे शेतकरी अडचणीत आलेले आहेत. सर्व स्तरावर ती भाजप सरकार अपयशी आले असल्यामुळे आंदोलनाने दि: २९ मे रोजी सकाळी दहा वाजता राष्ट्रवादी भवन कार्यालयातून जिल्हाधिकारी कार्यालयावर आधुनिक पद्धतीने आंदोलन केले जाणार आहे तारखेला पक्षाच्या वतीने सकाळी दहा वाजता या पक्ष कार्यालयातून सातारा जिल्हाधिकारी कार्यालयात आधुनिक पद्धतीचा आंदोलन केले जाणार आहे.

तीन विद्यार्थिनींनी आत्महत्या केली असली तरी त्याची जबाबदारी शिक्षण मंत्री घेत नाही. उलट जे दोष आहेत त्यांना भाजपमध्ये प्रवेश करून त्यांचे स्वच्छता मोहीम राबवली जाईल अशी टीका श्री शिंदे यांनी केलेले आहे. सातारा जिल्ह्यातल्या बेरोजगार तरुणांचा औद्योगिक क्षेत्रामध्ये मोर्चा काढला जाईल आणि तिथल्या लोकांना नोकरी व्यवसायासाठी प्राधान्य द्यावे यासाठीही आंदोलन होत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या संदर्भात महाविकास आघाडीच्या नेत्यांची




महत्त्वपूर्ण बैठक दिनांक २७ मे रोजी होत आहे. कोणत्या पक्षाने कोणत्या ठिकाणी उमेदवार द्यायचे याबाबत चर्चा होणार आहे. सध्या सातारा सांगली स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी माजी महसूल मंत्री बाळासाहेब पाटील व शशिकांत शिंदे तिच्या नावाची चर्चा होत आहे. अशीह त्यांनी माहिती दिली

सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष उपाध्यक्ष निवडीच्या नाट्यमय वेळी भाजप नेत्यांनी फसवले होते. आम्ही राष्ट्रवादी व शिवसेना सोबत होतो. आता स्थानिक स्वराज्य संस्थेबाबत शिवसेना व राष्ट्रवादीने भूमिका स्पष्ट करावी. त्यांना भाजप पक्ष दाबत असेल तर आम्ही त्यांच्यासोबत आहोत . हे सांगण्यासही ते विसरले नाहीत. दररोज सामान्य माणसांना अडचणीत आणून उद्योगपतींना फायदा व्हावा असे कायदे केले जात आहेत. बेरोजगारी वाढत असून काल लेबर कोर्ट मंजूर झाले आहे. ते किमान वेतन देण्यासाठी असले तर मग नोकरीची हमी कोण देणार? असाही मार्मिक प्रश्न त्यांनी केला.

भारत देशा स्वाभिमानी व स्वतंत्र आहे परंतु आजही अमेरिकेच्या दबावाखाली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निर्णय घ्यावे लागत आहे. पंतप्रधान मोदी अपयशी ठरलेले आहेत. कोरेगाव सारख्या ठिकाणी अमेरिकन नागरिकांना इंटरनेटच्या द्वारे गंडवले जात आहे. त्या इंटरनेट कॅफे व क्लासेसला कोणी परवानगी दिली? कोणी आश्रय दिला? एकाच इमारतीत कोचिंग क्लास व हा उद्योग होता. त्याचे उद्घाघाटन झाले होते. सध्याचे एस.पी. चांगले असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पोलिसांच्या विरोधात नाही तर जे लोकांच्या विरोधात काम करतात त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी आहे असे त्यांनी ठणकावून सांगितले. सध्या जे पोलीस अधिकारी रजेवर गेले आहेत. त्यांची केव्हा रजा संपते? हे मी पाहतोय. असे त्यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सचिव नरेश देसाई, सरचिटणीस राजकुमार पाटील, महिला पदाधिकारी सौ. सुवर्णाताई पाटील, सौ. समिंदरा जाधव, सौ. वैशाली जाधव, सौ. भिसे, समीर राजेघाडगे, अतुल शिंदे व तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कामगार कल्याण मंडळाची केंद्रे ग्रामीण भागात स्थलांतरित करण्याची मागणी

## लोकप्रतिनिधींना राज्य गुणवंत कामगार असोसिएशनचे निवेदन



कोल्हापूर : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची कोल्हापूर शहरातील काही केंद्रे ग्रामीण भागात स्थलांतरित करून तालुकास्तरावरील कामगार व त्यांच्या कुटुंबियांना कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी राज्य गुणवंत कामगार असोसिएशनच्या वतीने जिल्ह्यातील प्रमुख लोकप्रतिनिधींकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ ही शासनाची स्वायत्त संस्था असून विविध उद्योग, कारखाने, दुकाने, आस्थापना तसेच मोटार वाहतूक क्षेत्रातील कामगार, मालक व शासन यांच्या त्रिपक्षीय अंशदानातून मंडळाचा निधी उभारला जातो. या माध्यमातून कामगार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा व आरोग्यविषयक अनेक योजना राबविल्या जातात. सध्या कोल्हापूर जिल्ह्यात मंडळाची आठ केंद्रे कार्यरत असून त्यापैकी पाच केंद्रे कोल्हापूर शहरात आहेत. त्यामुळे शहर व परिसरातील कामगारांना त्याचा लाभ मोठ्या प्रमाणात मिळत असला, तरी आजरा, भुदरगड, राधानगरी, चंदगड, गडहिंग्लज, गगनबावडा आणि शाहूवाडी या तालुक्यांतील कामगारांना योजनांचा लाभ घेण्यासाठी शहरात येणे आर्थिकदृष्ट्या व भौगोलिकदृष्ट्या अडचणीचे ठरत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ग्रामीण भागात उद्योग, व्यवसाय व कारखान्यांची संख्या वाढत असतानाही या तालुक्यांतील कामगार मंडळाच्या योजनांपासून वंचित राहत असल्याची खंत असोसिएशनने व्यक्त केली आहे. कोल्हापूर शहरातील भाड्याच्या जागेत सुरू असलेली काही केंद्रे तालुकास्तरावर स्थलांतरित केल्यास अधिकाधिक कामगार मंडळाच्या कल्याणकारी प्रवाहात सहभागी होतील आणि मंडळ स्थापनेचा मूळ हेतूही साध्य होईल, असा दावा करण्यात आला आहे. यासंदर्भातील निवेदन सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ आणि विधान परिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील यांना देण्यात आले. यावेळी राज्य गुणवंत कामगार असोसिएशनचे अध्यक्ष सुरेश केसरकर यांच्यासह संजय सासने, अनिता काळे, भगवान माने, संभाजी थोरात, रघुनाथ मुधाळे, विजय आरेकर, शिवाजी चौगुले, मुनीर मुल्ला आणि सुभाष पाटील उपस्थित होते.

# सामान्य माणसाचा आवाज बुलंद करणारे साहित्य निर्माण व्हावे : कृष्णात खोत

## पहिले वेणूताई चव्हाण स्मृती मराठी साहित्य संमेलन उत्साहात



कराड : साहित्यिकांनी सत्तेला व समाजाला प्रश्न विचारणारे, सामान्य माणसाचा आवाज बुलंद करणारे लेखन करावे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक कृष्णात खोत यांनी केले. श्री कालिकादेवी नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे स्व. वेणूताई चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित पहिल्या 'स्व. वेणूताई चव्हाण स्मृती मराठी साहित्य संमेलन'च्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. सातारा साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, कराड तालुका पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष सूरज जमदाडे, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाहुपुरी शाखेचे अध्यक्ष नंदकुमार साळुंखे, ज्येष्ठ गझलकार प्रा. डॉ. सुनंदा शेळके, स्वागताध्यक्ष मुनीर बागवान-सावकार, चेअरमन राजन वेळापुरे, व्हाइस चेअरमन अनिल सोनवणे, प्रा. अशोककुमार चव्हाण उपस्थित होते.

कृष्णात खोत म्हणाले, साहित्य हे केवळ साहित्य म्हणून न पाहता अर्थशास्त्र, मानसशास्त्र आदी विविध शाखांच्या माध्यमातून अभ्यासले गेले पाहिजे. स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वामुळे कराडला आजही वेगळी ओळख असल्याचे सांगत कालिकादेवी पतसंस्थेने साहित्य संमेलन आयोजित करणे ही अनुकरणीय बाब असल्याचे नमूद केले. विनोद कुलकर्णी यांनी, कराड-पाटण तालुक्यातील साहित्यिकांना हे संमेलन मोठे व्यासपीठ ठरेल. नव्या पिढीतील लेखक व कवींना ज्येष्ठ साहित्यिकांचे मार्गदर्शन मिळेल, स्वागताध्यक्ष मुनीर बागवान-सावकार यांनी स्व. यशवंतराव चव्हाण सामाजिक कृतज्ञता पुरस्कार व स्व. वेणूताई चव्हाण महिला शक्ती गौरव पुरस्कारामागील भूमिका स्पष्ट केली. तसेच वेणूताई चव्हाण यांच्या स्मृती जपण्यासाठी हे साहित्य संमेलन दरवर्षी आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणा केली. संमेलनात रेखा दीक्षित, महालिंग मुंढेकर, डॉ. माणिक बनकर, क्रांती तानाजी पाटील, प्रणय सपकाळ, हेमा पाटील, डॉ. प्रभाकर पवार यांच्या विविध साहित्यकृतींचे प्रकाशन करण्यात आले. दुष्यंत देशपांडे, अरुण काकडे, डॉ. पी. एन. शिंदे आणि डॉ. अंजनी शहा यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

प्रा. अशोककुमार चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. प्रा. विलास सुर्वे यांनी कृष्णात खोत यांचा परिचय करून दिला. मकरंद किर्लोस्कर व सहकाऱ्यांनी ईश्वरस्तवन, संस्था गीत व संमेलन गीत सादर केले. प्रशांत लाड यांनी आभार मानले.

# श्री.राजेंद्र कदम यांची वैद्यकीय समन्वयकपदी निवड



पाटण : महाराष्ट्र राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री व सातारा जिल्ह्यांचे सुपुत्र मा.नामदार श्री. एकनाथ शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, खासदार डॉ. श्री.श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली तसेच महाराष्ट्र राज्याचे पर्यटन मंत्री तथा पालकमंत्री शंभूराजे देसाई यांच्या आदेशानुसार हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष तथा डॉ. श्रीकांत शिंदे फौंडेशनच्या वैद्यकीय समन्वयक म्हणून मोरणा विभागातून कोकिसरे गावचे सामाजिक कार्यकर्ते श्री. राजेंद्र कदम यांची निवड एकमताने करण्यात आली आहे.

सामाजिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेल्या श्री.राजेंद्र कदम यांच्या निवडीबद्दल परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सर्वसामान्य नागरिकांना वैद्यकीय मदत व मार्गदर्शन मिळवून देण्यासाठी ते प्रभावीपणे कार्य करतील, असा विश्वास मोरणा विभागातून व्यक्त करण्यात येत आहे.

या निवडीबद्दल त्यांचे महाराष्ट्र राज्याचे पर्यटन, खनीकर्म ,माजी सैनिक कल्याण मंत्री तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार श्री.शंभूराज देसाई साहेब, मोरणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.रविराज देसाई दादा,लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्यांचे चेअरमन श्री.यशराज देसाई ,युवा नेते ड जयराज देसाई, यशराज देसाई, पाटण पंचायत समिती सदस्य श्री.प्रशांत पवार, श्री.नथुराम कुंभार, माजी सरपंच श्री.राजू पवार, श्री. दत्तात्रय पवार, डॉ. किशोर गुरव,बशीर खोंदु,यांनी अभिनंदन केले.

# धावडी व कांबटवाडी येथील बुद्ध लेणींची स्वच्छता मोहीम संपन्न



सातारा : बौद्ध युवा जागृती परिषद,कराड व सह्याद्री लेणी संवर्धक समूह,वाई यांच्या संयुक्त विद्यमाने वाई तालुक्यातील रेणुसे वस्ती (वाघमळा) धावडी बुद्ध लेणी व कांबटवाडी बुद्ध लेणी परिसर येथे साफसफाई व स्वछता मोहीम संपन्न झाली. जिल्ह्याला लाभलेला अलौकिक असा वैभवसंपन्न प्राचीन वारसा वाचविणे.

ही प्रत्येक सातारकर व सर्व भारतीयांची जबाबदारी आहे. त्यासाठी प्रामुख्याने तरुण वर्गाने पुढे येऊन संवर्धन व लेणी बचाव अभियानात सामील होणे गरजेचे आहे.असे विचार रोहित वाघमारे यांनी व्यक्त केले.

या कार्यशाळेसाठी प्रमुख उपस्थिती युवा लेणी अभ्यासक संग्राम खरात (वाई), लेणी संवर्धक कैलास कांबळे, रोहित वाघमारे,स्वप्नील जाधव, अक्षय कांबळे, स्वप्नील चौथमहल, प्रबुद्ध सोनावणे,स्वागत सोनवले,तानाजी कांबळे, अनुराधा माने,पंचशीला वाघमारे,अमोल वाघमारे,श्रीधर गोखले, शशिकांत दुपटे, संजय कांबळे, विशाल कांबळे, रुपेश मोरे, सिद्धार्थ कांबळे, सुजित खुंटे, उल्हास गायकवाड व अन्य काही लेणी संवर्धक उपस्थित होते.

# घोरपडीच्या अवयवांची तस्करी; दोन आरोपी अटकेत




**न्यायालयाकडून तीन दिवसांची वनकोठडी**

सातारा : घोरपड या वन्यप्राण्याच्या अवयवांची अवैधरित्या तस्करी करून विक्री करणाऱ्या दोन आरोपींना वाई वनविभागाने सापळा रचून अटक केली असून, न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची वनकोठडी सुनावली आहे. या कारवाईत घोरपडीचे अवयव, संशयित वन्यप्राण्यांची नखे, 'इंद्रजाल'सह रोख रक्कम, मोबाईल आणि वाहन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

वनपरिक्षेत्र अधिकारी (संरक्षण व अतिक्रमण निर्मूलन) सातारा तसेच अतिरिक्त कार्यभार वाई यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार वाई वनपरिक्षेत्रातील कर्मचारी आणि सातारा फिरते पथक यांनी संयुक्तपणे सापळा रचला. शुक्रवारी (दि. २३) सायंकाळी सुमारे ६.१५ वाजण्याच्या सुमारास वाई-मांढरदेव मार्गावरील कोचळेवाडी हद्दीतील हॉटेल विक्रांत परिसरात संशयित वाहनाची तपासणी करण्यात आली.

या कारवाईत महेश सूर्यकांत व्होनफडे (वय २६, रा. तांबवे, ता. माळशिरस, जि. सोलापूर) आणि रोहन गजानन कदम (वय २३, रा. तांबवे भवानीनगर, पो. माळीनगर अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर) यांना ताब्यात घेण्यात आले. आरोपींकडील मारुती सुझुकी वॅगनआर (एमएच-१४ एचडब्ल्यू-०५०६) वाहनाची झडती घेतली असता घोरपडीच्या मानेपासून तोंडापर्यंतचा अवयव, नर घोरपडीचे चार लिंग (हत्ताजोडी), वाघ अथवा बिबट्यासदृश वन्यप्राण्याचे नख आणि समुद्री वन्यजीवाशी संबंधित 'इंद्रजाल' असा मुद्देमाल आढळून आला.

याशिवाय आरोपींकडून १५ हजार रुपयांची रोख रक्कम, दोन मोबाईल फोन आणि तस्करीसाठी वापरण्यात आलेले वाहन जप्त करण्यात आले. या प्रकरणी वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत विविध कलमान्वये वनगुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना शनिवारी (दि. २४) प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, वाई यांच्यासमोर हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची वनकोठडी सुनावली. या प्रकरणाचा पुढील तपास वनपरिक्षेत्र अधिकारी, वाई करीत आहेत.

ही कारवाई उपवनसंरक्षक अमोल सातपुते, विभागीय वनाधिकारी (दक्षता) संजय वाघमोडे, सहायक वनसंरक्षक प्रदीप रौंधळ यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी गणेश महांगडे, वनपाल संग्राम मोरे, वनपाल धोंडीबा बोडके तसेच वाई वनपरिक्षेत्र व फिरते पथकातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी पार पाडली. मानद वन्यजीव रक्षक रोहन भाटे यांनीही या मोहिमेत मोलाची मदत केली.

दरम्यान, वन्यप्राण्यांची शिकार, तस्करी किंवा त्यांच्या अवयवांची खरेदी-विक्री करणे हा वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत गंभीर गुन्हा असून, दोषींना तीन ते सात वर्षांपर्यंत कारावास आणि किमान २५ हजार रुपयांच्या दंडाची तरतूद असल्याचे वनविभागाने स्पष्ट केले आहे. नागरिकांनी अंधश्रद्धा अथवा जादूटोण्याच्या नावाखाली अशा प्रकारच्या कृत्यांना बळी पडू नये तसेच संशयास्पद हालचालींची माहिती तातडीने वनविभागाला द्यावी, असे आवाहन उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांनी केले आहे.

# काँग्रेसच्या ओबीसी विभागाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी भानुदास माळी यांची नियुक्ती



मुंबई : अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या ओबीसी विभागाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते भानुदास माळी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे राज्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

भानुदास माळी यांनी यापूर्वी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या ओबीसी विभागाच्या प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी तब्बल पाच वर्षे सांभाळली आहे. या काळात त्यांनी ओबीसी समाजातील लहान व वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पक्ष संघटन मजबूत करण्यावर विशेष भर दिला होता.

सामाजिक व राजकीय आंदोलनांमध्ये सक्रिय सहभाग घेत तळागाळातील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम करण्याची त्यांची शैली पक्षात प्रभावी मानली जाते. राज्यभरातील ओबीसी समाजाशी असलेला त्यांचा संपर्क आणि संघटन कौशल्याचा आगामी निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाला निश्चितच फायदा होईल, असा विश्वास पक्ष पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, त्यांच्या नियुक्तीनंतर काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, अनेक नेत्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. खासदार मुकुल वासनिक, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले तसेच माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी भानुदास माळी यांना शुभेच्छा देत पक्ष संघटन अधिक बळकट करण्यासाठी त्यांच्या कार्याला यश लाभो, अशा भावना व्यक्त केल्या.

# साताऱ्यात आंबेडकर सेंटर फॉर जस्टिस अँड पीस आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटनेतर्फे चर्चासत्राचे आयोजन!



सातारा : येथील कनिष्क मंगल कार्यालयात गुरुवार दि.२८ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत एक दिवसीय चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.अशी माहिती आंबेडकर सेंटर फॉर जस्टीस अँड पीस आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटनेने दिली आहे.

राज्यातील अनुसूचित जातीमधील उपवर्गीकरणाचा निर्णय १ ऑगस्ट २०२४ रोजी न्यायालयाने देताना उपवर्गीकरणाचा अधिकार राज्याला असल्याचा सांगितले आहे. आणि महाराष्ट्रात अनुसूचित जातीमधील दोन मोठे समूह एकमेकांविरुद्ध उभे ठाकले आहेत.शिवाय, सोशल मीडियामधून वाद उफाळून आले आहेत.खरंतर उपवर्गीकरण हा विषय अनुसूचित जातींमध्ये मर्यादित न राहता त्याची इतर जातींमधून जास्त चर्चा होऊ लागली आहे. म्हणूनच या विषयावर चिंतनात्मक चर्चा होणे आवश्यक आहे.एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे.तेव्हा अनुसूचित जातीमधील उपवर्गीकरण; वास्तव आणि भविष्यातील परिणाम यावर प्रमुख वक्ते केशव वाघमारे (फुले आंबेडकर चळवळीचे अभ्यासक) व धम्मसंगिनी रमागोरख (स्त्रीवाद आणि स्त्रीमुक्ती चळवळीच्या अभ्यासक) मार्गदर्शन करणार आहेत.अध्यक्षस्थान विनोद ताटके (महासचिव आंबेडकर सेंटर फॉर जस्टिस ऍण्ड पीस आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटना महाराष्ट्र राज्य) भूषवणार आहेत.तेव्हा सर्वांनी उपस्थीत रहावे.असे आवाहन निमंत्रक सर्व पदाधिकारी व सदस्य (आंबेडकर सेंटर फॉर जस्टीस ॲण्ड पीस आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटना सातारा जिल्हा) यांनी केले आहे.

# राज्यपालांच्या पुढाकाराने 'टीबीमुक्त मुंबई' अभियान

## राज्यपालांच्या हस्ते क्षयरुग्णांना पोषण आहार किटचे वाटप



मुंबई : महाराष्ट्र लोकभवनाच्या पुढाकाराने बृहन्मुंबई महानगरपालिका मंगळवारपासून 'टीबी मुक्त मुंबई' अभियान सुरु करीत असून अभियानाचा आरंभ राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या उपस्थितीत धारावी व सायन येथे होणार आहे. मुंबईच्या महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घडी व महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांच्या उपस्थितीत धारावी येथील श्री. एकनाथराव गायकवाड नागरी आरोग्य केंद्र येथे तसेच ११.३० वाजता सायन येथील लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रूग्णालय येथे अभियानाची सुरुवात करण्यात येणार आहे. यावेळी राज्यपालांच्या हस्ते क्षयरूग्णांना पोषण आहार किटचे वाटप देखील करण्यात येणार आहे.

# लक्ष्मण खरात यांचे निधन



सातारा : लक्ष्मण श्रीपती खरात (सिद्धनाथ वाडी, वाई) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी,मुलगी, जावई, मुलगा,सून व नातवंडे असा परिवार आहे. प्राध्यापिका सौ.वैशाली शंकर शेळके - खरात (न्यू इंग्लिश स्कूल कन्या शाळा, लोणंद) यांचे ते वडील होत. त्यांच्या जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.